# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.10.2025** **वार- बुधवार**

---

**<u>मोदीसंस्कृत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' तसच 'संसदेत' उल्लिखित केलेल्या सुभाषितांचं संकलन " उद्गारा:" या पुस्तक रूपात , संस्कृतभारतीच्या न्यासानं प्रकाशित केले आहे. त्याचा समर्पण सोहळा पंतप्रधानांच्या निवासस्थानी नुकताच झाला. त्यावेळी आपल्याला भाषणात सुभाषिते वापरण्याची प्रेरणा सरसंघचालक बाळासाहेब देवरसांकडून मिळाली. काही काळापूर्वी संस्कृत ही केवळ विद्वानांची भाषा होती.संस्कृतभारतीने ती सर्वत्र पसरविली असं प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी केलं. संस्कृतभारतीच्या पुण्यातील कार्यकर्त्या वैखरी कुलकर्णी आणि रंजना फडणीस यांनी पुस्तकाचे संपादन केलं आहे. संस्कृतभारतीचे अखिल भारतीय संपर्क प्रमुख श्रीशजी देवपुजारी यावेळी उपस्थित होते.

**<u>अंतिमअहवाल</u>**

पुणे जिल्ह्यात सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अंतिम अहवाल तयार झाला असून, नुकसानीचा आकडा २१ हजार ९९३ हेक्टरवर पोहोचला आहे. या नुकसानीसाठी ३४ कोटी ६१ लाख ६३ हजारांची आवश्यकता आहे. पंचनामे पूर्ण होण्यास विलंब झाल्याने अहवाल अंतिम होण्यास ऑक्टोबरचे पंधरा दिवस लागले.

**<u>मतदारयादी</u>**

राज्य निवडणूक आयोगाने  महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. ६ नोव्हेंबरला प्रारूप मतदार यादी जाहीर होणार असून, १० डिसेंबरला  मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार यादी जाहीर केली जाणार आहे. पुणे महापालिकेच्या १६५ नगरसेवक पदांसाठी ही निवडणुक होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंत नोंदणी झालेली यादीच , या निवडणुकीसाठी वापरण्याचे आदेश दिल्यामुळे, जुलैनंतर नोंदणी केलेल्या मतदारांना पालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान करता येणार नसल्याचं  स्पष्ट केलं आहे.

**<u>साथ</u>**

पुण्यातील  कोथरूड आणि बावधन परिसरातली  उलट्या, जुलाबाची साथ दूषित पाण्यातल्या ‘कोलिफार्म’  जीवाणूमुळे पसरल्याचे समोर आले आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाने या परिसरात केलेल्या पाणी नमुन्यांच्या तपासणीत ही बाब निष्पन्न झाली आहे. या भागातील उलट्या, जुलाबाच्या रुग्णांची संख्या ११६ वर पोहोचली असली तरी काल आणि आज एकही रुग्ण न आढळल्यानं साथ आटोक्यात आल्याचा दावा महापालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे.

**<u>वैद्यकीयप्रवेश</u>**

वैद्यकीय प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत नव्याने प्रवेश अर्ज भरलेल्या १५२ विद्यार्थ्यांची कागदपत्रं  चुकीची असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने म्हणजेच सीईटी सेलनं नोटीस पाठविली आहे. या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांबाबत सीईटी कक्षाकडे आलेल्या तक्रारींची दखल घेत कागदपत्रांची प्राथमिक तपासणी करण्यात आली.

**<u>वाचनप्रेरणादिन</u>**

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. मोरवाडी इथल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून विविध उपक्रमांच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला.

**<u>मॉकड्रिल</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चऱ्होली उपअग्निशमन केंद्रानं, सांडपाणी शुद्धीकरण केंद्रात गॅस लिकेज, आग विझविण्याच्या पद्धतींवर आधारित मॉक ड्रिलचे आयोजन केलं होतं. तसंच सांडपाणी शुद्धीकरण केंद्रात पडलेल्या व्यक्ती किंवा प्राण्यांचं ,त्यातल्या विषारी वायूंपासून रक्षण करून प्राथमिक स्तरावर बचावकार्य कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अमितेशकुमारपुण्यातील गुन्हेगारी टोळ्यांची 'इकोसिस्टम' उद्ध्वस्त करणार असल्याचं पुण्याचे आयुक्त अमितेश कुमार यांनी म्हटलं आहे. पुणे मर्चंट चेंबर्सच्या कार्यक्रमात आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधत गुन्हेगारी करणाऱ्या आणि कायदा तोडणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला.

तडीपारपुणे शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर १८ सराईत गुन्हेगारांना पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीणच्या हद्दीतून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. एकाचवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर तडीपारीची कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ आहे. कारवाई केलेल्यांमध्ये काही महिलांचाही समावेश आहे.

**<u>नाशिकफाटापादचारी</u>**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना बस, मेट्रो, एसटी, रेल्वे आदी सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक फाटा चौकात पादचारी पूल उभारण्यात येत आहे. सार्वजनिक वाहतुकीसाठी उभारलेला हा शहरातील पहिला पादचारी सेतू ठरणार आहे.

**<u>वर्धापनदिन</u>**

नवचैतन्य हास्ययोग परिवाराचा वर्धापन दिन आज गणेश कला क्रीडा मंदिरात उत्साहात साजरा झाला. हास्ययोग म्हणजे आनंदी जीवांचे टॉनिक आहे, असं मधुमेहतज्ज्ञ डॉ. भाग्येश कुलकर्णी यांनी यावेळी सांगितलं. यावेळी नवचैतन्य आरोग्य संहिता या अधिकृत व्यायाम पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

पुण्याच्या काही भागात आज संध्याकाळी मुसळधार पाऊस पडला त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेत पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता,ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**